# सत्यशोधक महात्मा जोतीराव फुले

प्रिय बहीण-भावांनो,

11 एप्रिल - महात्मा जोतीराव फुले यांची जयंती. अनिष्ठ रुढी-परंपरांविरोधात लढणारे म. फुले हे आपल्या सर्वांचे आद्य शिक्षकही आहेत. त्यामुळे 11 एप्रिल हा दिवस आपण शिक्षक सन्मान दिन म्हणून साजरा करत आहोत.

या महान क्रांतीसुर्याच्या कार्याचा हा थोडक्यात परिचय:



## वंचितांसाठी शिक्षणाची दारे उघडली

शेकडो वर्षांपासून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या तथाकथित शूद्र, अस्पृश्य आणि सर्व स्त्रियांसाठी महात्मा फुलेंनी शिक्षणाची दारे उघडली.

## मुलींची पहिली शाळा

1848 साली जोतीरावांनी पुण्यातील भिडे वाड्यात भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. जोतीरावांनी सावित्रीबाईंना साक्षर करून भारतातील पहिली स्त्री शिक्षिका व पहिली प्रशिक्षित मुख्याध्यापिका बनविले.

शूद्र व स्त्रियांच्या उद्धाराच्या कामामुळे जोतिरावांना रुढीवादी समाजाचा प्रचंड विरोध झेलावा लागला. सावित्रीबाईंना शेणा-दगडाचा मारा सहन करावा लागला. त्यांच्यावर जीवघेणे हल्लेही झाले. लोकांच्या होणाऱ्या विरोधामुळेच जोतीरावाच्या आई वडीलांनी त्यांचे राहते घर सोडायला लावले. अशावेळी त्यांना पुण्यातील गंजपेठेतील उस्मान शेख यांनी राहायला घर दिले. त्यांची बहीण फातिमा शेख यांनीही सावित्रीबाईंसोबत मुलींना शिकवण्यास सुरुवात केली.



## अस्पृश्यांसाठी भारतातील पहिली शाळा

1852 साली म. फुलेंनी पुण्यात अस्पृश्यांसाठी भारतातील पहिली शाळा सुरू केली. तिथे धुराजी चांभार व गणू शिवाजी मांग हे दलित शिक्षक नेमले. स्थानिक लोकांनी सुरू केलेली ही भारतातील पहिली 'अस्पृश्यांची' शाळा होती.

## शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी

1882 साली हंटर कमिशनसमोर त्यांनी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह धरला. **"सर्व पातळीवरच्या शिक्षण यंत्रणा सरकारी नियंत्रणाखालीच राहणे योग्य ठरेल.** त्यासाठी ते आग्रह धरतात:

**स्थानिक कराच्या निधीतील 50% खर्च केवळ प्राथमिक शिक्षणावर केला पाहिजे.**

## महिलांच्या आत्मसन्मानासाठी संघर्ष

त्याकाळी महिलांची अवस्था अतिशय दयनीय होती. विधवा महिलांचे सर्रास शोषण केले जायचे.

**बालहत्या प्रतिबंध गृह:** 1863 साली विधवांना बाळंत होण्यासाठी जोतिरावांनी आपल्या राहत्या घरी 'बालहत्या प्रतिबंध गृहाची' स्थापना केली. काशीबाई या विधवेच्या पोटी जन्माला आलेल्या यशवंत या मुलास दत्तक घेतले.

**न्हाव्यांचा संप:** 1865 साली विधवांच्या केशवपनाची प्रथा बंद पाडण्यासाठी न्हाव्यांचा संप घडवून आणला.

**विधवा पुनर्विवाह:** 1864 साली गोखलेंच्या बागेत विधवा पुनर्विवाह घडवून आणला.

## छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास शोधला

म. फुलेंनी रायगडावरील छ. शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली. तसेच शिवरायांवरील पहिला पोवाडा लिहिला. शिवरायांच्या विचारातून लोकांना प्रेरणा मिळावी यासाठी त्यांनी सार्वजनिक शिवजयंती सुरू केली.

## इंग्रजांवर शेतकऱ्याचा आसूड उगारला

**“सरकारने नवनवे कर लावून शेतकऱ्यांची लूट केल्यामुळेच शेतकरी कर्जबाजारी झाला”**, इंग्रजांवर अशी परखड टीका त्यांनी केली. **शेतीसाठी उपाय सुचवले:** शेतकऱ्याला अत्याधुनिक ज्ञान मिळावे; उत्तम बैल मिळावेत; शेतीसाठी पाणी मिळावे म्हणून शासनाने जागोजागी तळी, बंधारे बांधावीत; विहिरींचा धडक कार्यक्रम हाती घ्यावा; जनावरांनी पिकांची नासाडी केल्यास सबंधित अधिकाऱ्यांच्या पगारातून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी.

## सत्यशोधक समाजाची स्थापना केली

‘सार्वजनिक सत्य धर्म’ लिहून न्याय आणि समतेवर आधारित धर्माचा पर्याय दिला.

## जोतिरावांचे विचार भारतीय संविधानात

- **स्वातंत्र्य** – “निर्माणकर्त्याने सर्व स्त्री-पुरुषास धर्म व राजकीय स्वातंत्र्यता दिली आहे. त्यांना समान हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ केले आहे.”
- **समता** – “या पृथ्वीवरील सर्व मानव शारीरिक व बुद्धिकौशल्याने समान आहेत. कोणीही इतरांपेक्षा पिढीजात श्रेष्ठ व पवित्र नाही.”
- **बंधुता** – ते म्हणतात, “ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणाशी, धरावे पोटाशी बंधुपरी.”
- **धर्मनिरपेक्षता** – त्यांचा धर्माबद्दलचा दृष्टिकोन खूप व्यापक होता. ते म्हणतात, “माणसाला जन्माने धर्म न मिळता तो त्याला स्वतःच्या बुद्धीने स्वीकारता आला पाहिजे. एकाच कुटुंबात कोणी हिंदू होईल, कोणी मुसलमान, कोणी शीख, कोणी ख्रिश्चन होईल.”
- **अस्पृश्यता निर्मूलन** – 1868 साली आपल्या अंगणातील हौद अस्पृश्यांसाठी खुला केला.
- **सामाजिक न्याय** – सरकारी नोकऱ्यांमध्ये प्रत्येक जातीला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे यासाठी त्यांनी एक मोठी चळवळ सुरू केली.

**प्रत्येक माणसाला सन्मानाने जगता यावे, यासाठी आयुष्यभर संघर्ष केलेल्या ‘जोती-सावित्रीचे’ विचार आपल्याला भारतीय संविधानात पावलोपावली पाहायला मिळतात.**




आपले संविधान हे संतविचार आणि शिव-फुले-शाहू-आंबेडकरी विचारांच्या संगमातून तयार झालेले आहे. ‘जोति-सावित्रीच्या' कल्पनेतील न्यायपूर्ण समाजाची स्थापना ही संविधानाच्या योग्य अंमलबजावणीतूनच शक्य आहे. जोतिराव आणि संविधानाचा विचार अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. संविधान जागर अभियान यासाठी प्रयत्न करत आहे. आपण यात जरूर सामील व्हावे, असे प्रेमपूर्वक आवाहन!

**संविधान जागर अभियान**

निमंत्रक समिती: **मा.न्या.बी.जी. कोळसे पाटील, प्रा.डॉ. सुखदेव थोरात, तुषार गांधी, उत्तम कांबळे, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन**

स्वप्निल फुसे: 79723 45764 | नागार्जुन वाडेकर: 98602 39899 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739

samvidhanjagar.org

संविधान जागर अभियानाचे इतर माहिती मिळवण्यासाठी ग्रुपमध्ये सामील व्हा!